Ex.16

विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,गंगाखेड

विशेष दि.दा.क्र.4/2026

वादी : राहिला बेगम

विरुध्द

प्रतिवादीः मधुसुदन

वाद : मनाई आज्ञा.

ORDER
Read & recorded.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.20 12:41:43 +0530

CJSD, Gangakhed.

प्रतिवादी क्र.1 तर्फे वादीच्या तात्पुरता मनाई आदेश मिळणेस्तव अर्जाचा से खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1. असे की, अर्जातील कलम नं.1 मधील मजकुर वादी क्र.1 ते 3 अजारी आहे. त्या न्यायालयात येवु शकत नाहीत. त्यांनी अधिकार पत्र दिले आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे. प्रतिवादीला अमान्य आहे.

2. असे की, अर्जातील कलम नं.2 मधील मजकुर वादी क्र.1,2 व 3 आपसात नातेवाईक आहेत, त्यांची सासु आबेदाबेगम 2003 मध्ये मयत झाली. हा माहिती अभावी अमान्य आहे. वादी व आबेदाबेगम यांनी मुळ मालक श्रीनिवास वासुदेवराव राजेद्र, विलास, विनोद, प्रमोद पि. श्रीनिवास व त्यांच्या बहिणीकडुन सदर जायदाद खरेदीखत क्र.669/1997 दि.17/07/1997 रोजी खरेदी केली. आबेदाबेगम हयात नाही. प्रतिवादी क्र.4 व 5 आणी वादी

पान..2..वर

वारस आहे, विक्रदाराने त्यांना ताबा दिला. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

3. असे की, अर्जातील कलम नं.3 मधील मजकुर मुळ मालक राजेंद्र कुटुंबांने वाटणी झाल्या नंतर त्यांची शेती सर्वे नं. 428/1, 428/2 वादीच्या कुटुंबात विक्री केली. कमलबाईने हाजी अब्दुल समद व त्याची मुले यांना विक्री केले. हा मजकुर स्पष्ट कथन नसल्यामुळे अमान्य आहे. सर्वे नं.428/2 हा 428/1 च्या उत्तरेस व सर्वे नं.428/2 हा गंगाखेड परळी रोडच्या उत्तरेला आहे. हा मजकुर नकाशा दाखल नसल्यामुळे अमान्य आहे.

4. असे की, अर्जातील कलम नं.4 मधील मजकुर खरेदीखता आधारे महसुल विभागाने फेरफार मंजुर केले, 7/12 मध्ये नोंदी झाल्या हा कार्यपध्दतीचा भाग आहे. मात्र त्या आधारे ताबा प्रस्तापित होत नाही.

5. असे की, अर्जातील कलम नं.5 मधील मजकुर अताउर रहिमान व फजलुर रहिमान व त्यांच्या वडिलांनी शेजारी उत्तरेकडील शेती कमलबाईकडुन त्याच वेळी खरेदीखत क्र.668 अधारे खरेदी केले हा मजकुर कागदपत्र दाखल नसल्यामुळे अमान्य आहे. वादीने सोयाबीन, कापुस पेरले वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे.

6. असे की, अर्जातील कलम नं.6 मधील मजकुर प्रतिवादी क्र.1 ते 3 च्या वडिलांनी सुनिल चौधरी व अविनाश चौधरी यांच्याकडुन सर्वे नं.428/3 मधील प्रत्येकी

पान..3..वर

1 हेक्टर 94 आर खरेदीखत नं. 441 व 442 आधारे खरेदी केले. हा मजकुर बरोबर आहे. मात्र ही खरेदी केलेले शेती गंगाखेड परळी रोडच्या उत्तरेस व दक्षिणेस आहे. अर्जातील मजकुर माणिकराव यांनी खरेदी केलेली शेती गंगाखेड परळी रोडच्या उत्तरेला नाही. हा मजकुर असत्य आहे. तसेच प्रतिवादी दुरुस्तीपत्र करणेचे हक्कदार नाही. हा मजकुर अमान्य आहे.

7. असे की, अर्जातील कलम नं.7 मधील मजकुर प्रतिवादी क्र.1 ते 3 चे वडिल दि.13/08/2016 रोजी मयत झाले. प्रतिवादी क्र.1 ते 3 त्यांचे वारस आहेत. प्रतिवादीच्या वडिलांनी मोजणी अर्ज केला, मोजणी झाली. हा बरोबर आहे. मात्र खरेदीखता नुसार गंगाखेड परळी रोडच्या फक्त दक्षिण बाजुस आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

8. असे की, अर्जातील कलम नं.8 मधील मजकुर 2014 मध्ये प्रतिवादीच्या वडिलांनी क्षेत्रफळ 1 हेक्टर 40 आर दि.19/09/2014 रोजी प्रतिवादी क्र.4 ला विक्र केले. हा बरोबर आहे. मात्र एन.ए. झाल्यानंतर हेक्टरमध्ये विक्री होवु शकत नाही. हा मजकुर असत्य आहे.

9. असे की, अर्जातील कलम नं.9 मधील मजकुर खरेदीखत क्र.441 व 442 मधील चतुःसिमा प्रतिवादी क्र. 4 वर बंधनकारक आहे. हा असत्य आहे. प्रतिवादी क्र.1 ने उर्वरित प्रतिवादी सोबत संगणमत करुन खोटा बनावटी

पान..4..वर

दस्त करुन वादीची शेती हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

10. असे की, अर्जातील कलम नं.10 मधील मजकुर प्रतिवादी क्र.1 ते 3 यांनी प्रतिवादी क्र.4 सोबत संगणमत करुन परभणी येथे दुरुस्तीचा दस्त केला. परभणी कार्यालयास अधिकार नाही. दस्त क्र.5467 दि.20/06/2025 चा बोगस बनावटी आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

11. असे की, अर्जातील कलम नं.11 मधील मजकुर दुस्ती दस्त आधारे प्रतिवादी वादीच्या शेतात अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात आहेत. 428/2 गंगाखेड परळी रोडच्या उत्तरेला आहे. प्रतिवादीची मालकी गंगाखेड परळी रोडने बांधील आहे. वादीची जागा हडप करण्यासाठी दस्त बोगस तयार केला आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

12. असे की, अर्जातील कलम नं.12 मधील मजकुर पुर्वीची पुनरावृत्ती आहे. मात्र प्रतिवादी क्र.4 ला खरेदीखत करुन देण्याचा अधिकार नाही. 2151 मधील चतुःसिमा बनावटी आहे, दस्त बोगस बनावटी आहे. तो रद्द होणे आवश्यक आहे, वादीवर बंधनकार नाही. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

13. असे की, अर्जातील कलम नं.13 मधील मजकुर प्रतिवादी राजकीय प्रभावाखाली फेरफार करुन घेणे यशस्वी झाला. फेफार आधारे मालकी मिळत नाही. हा असत्य व खोटा आहे.

पान..5..वर

14. असे की, अर्जातील कलम नं.14 मधील मजकुर पुनरावृत्ती आहे. त्याचे पुर्वीच उत्तर दिले आहे.

15. असे की, अर्जातील कलम नं.15 मधील मजकुर मोजणी तारखेला प्रतिवादी भुमापक आले नाहीत. नंतर वादीला समजले प्रतिवादी क्र.1 ने राजकीय प्रभावाखाली मोजणी अधिका-यांशी संगणमत करुन बेकायदेशीर मोजणी करुन घेतली. त्यामुळे प्रतिवादी वादीला बेदखल करेल, अशी भिती आहे. हा असत्य व खोटा आहे.

16. असे की, अर्जातील कलम नं.16 मधील मजकुर दि.06/01/2026 ही तारीख काल्पनीक व खोटी आहे.

17. असे की, अर्जातील कलम नं.17 मधील मजकुर स्पेशल सुट नं.17/2024 च्या आदेशाची प्रत वादपत्रात सादर नसल्याने उत्तर देण्यास मजबुरी आहे.

18. असे की, अर्जातील कलम नं.18 मधील मजकुर वादीची केस प्रथमदर्शनी सिध्द आहे, बॅलेन्स ऑफ कनव्हीनियन्स वादीच्या हक्कात आहे. वादीचे नुकसान होणार आहे. हा मजकुर असत्य व खोटा आहे.

<u>अधिक निवेदन</u>

19. असे की, वादीचा तात्पुरता मनाई आदेश मिळणेचा अर्ज असत्य निवेदनावर अधारीत असल्यामुळे खारीज करण्यात यावा.

20. असे की, वादी क्र.1 ते 3 यांनी त्यांच्या मुलाच्या हक्कात केलेले अधिकार पत्र वादपत्रात दाखल नसल्यामुळे

पान..6..वर

अर्ज खारीज करण्यात यावा.

21. असे की, वादीनी मयत अबेदाबेगमचे वारसा प्रमाणपत्र दाखल केले नसल्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

22. असे की, वादीने अर्जातील कलम नं.2 मध्ये नमुद केलेले खरेदीखत अनु. क्र.669 दि.30/01/2026 च्या कागदपत्राच्या यादु नुसार दाखल केले नाही, ते समन्स सोबत प्रतिवादीला मिळाले नाही. त्यामुळे अर्ज खारीज करण्यात यावा.

23. असे की, वादीने अर्जात कलम नं.3 मध्ये रजेंद्र कुटुंबाच्या वाटणीचा, हजी अब्दुल समद च्या खरेदीखताचा उल्लेख केला आहे. परंतु वाटण्या कधी झाल्या, कोणाला किती वाटणी मिळाली या बदल स्पष्ट कथन केले नाही. हजी अब्दुल समदच्या खरदेदीखताची प्रत दाखल केली नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

24. असे की, प्रतिवादी क्र.1 चे वडिल माणिकराव सोपानराव केंद्रे यांनी सर्वे नं.428/3 क्षेत्रफळ 1 हेक्टर 94 आर मौजे गंगाखेड ही शेती मुळ मालक सुनिल रामराव चौधरी यांचेकडुन दि.13/03/2006 रोजी खरेदीखत अनु.क्र.441 व्दारे खरेदी केली आहे. सदरील शेती दोन भागात असल्याने चतुःसिमा दोन भागात आहेत. भाग क्र.1 च्या चतुःसिमा पुर्वेसः अविनाश बालासाहेब चौधरी, पश्चिमेसः पांदण जुना रस्ता, दक्षिणेसः देशमाने अंबेकरचे शेत, उत्तरेसः परळी

पान..7..वर

गंगाखेड रोड तुकडा नं.2 ची चतुःसिमा पुर्वेसः समद जिनींग, पश्चिमेस पांदण, दक्षिणेसः परळी गंगाखेड रोड, उत्तरसे समद ची जिनींग अशा आहेत.

25. असे की, प्रतिवादी क्र.1 चे वडिल माणिकराव सोपानराव केंद्रे यांनी सर्वे नं.428/3 क्षेत्रफळ 1 हेक्टर 94 आर मौजे गंगाखेड ही शेती मुळ मालक अविनाश बालासाहेब चौधरी यांच्याकडुन दि.13/03/2006 रोजी खरेदीखत अनु.क्र. 442 आधारे खरेदी केली आहे. त्यांच्या चतुःसिमा पुर्वेसः कापसेचे शेत, पश्चिमेसः सुनिल रामराव चौधरी, दक्षिणेसः देशमान व अंबेकर, उत्तरेसः गंगाखेड परळी रोड अशा आहेत. माणिकराव केंद्र यांनी खरेदी केलेल्या सर्वे नं. 428/3 क्षेत्रफळ 3 हेक्टर 66 आरच्या दक्षिणेस उत्तरेसः दोन्ही बाजुस परळी गंगाखेड रोड आहे.

26. असे की, मणिकराव केंद्रे यांनी प्रतिवादी क्र.4 यास शेत सर्वे नं.428/3 क्षेत्रफळ 1 हेक्टर 40 आर मौजे गंगाखेड ही शेती दि.19/09/2014 रोजी खरेदीखत अनु. क्र.2151 आधारे विक्री केली. माणिकराव यांनी खरेदीखत क्र.441 सुनिल चौधरीकडुन खरेदी केलेली शेती विक्री केली. ज्या खरेदीखतात दक्षिणेस परळी गंगाखेड रोड अशी चतुः सिमा होती. परंतु खरेदीखत अनु.क्र.2151 मध्ये दक्षिणेस परळी गंगाखेड रोड ऐवजी देशमाने, अंबेकर यांचे शेत अशी चुकीची चतुःसिमा लिहीन्यात आली. ती चुक दुरुस्ती दस्त क्र.5467 दि.23/06/2025 रोजी करण्यात

पान..8..वर

आली आहे. सदर चुक दुरुस्ती पत्रात खरेदीखत क्र.441 मधील दक्षिणेसः परळी गंगाखेड या चतुःसिमेचा आधार असल्यामुळे चुक दुरुस्ती पत्र दस्त क्र.5467 हा कायदेशीर आहे.

27. असे की, प्रतिवादी क्र.4 ने कायदेशीर गरजेपोटी शेत सर्वे नं.428/3 क्षेत्रफळ 41.77 आर ज्याची चतुःसिमा पुर्वेसः समद यांचा वजन काटा, पश्चिमेसः समद यांचे शेत, दक्षिणेसः गंगाखेड परळी जाणारा रस्ता, उत्तरेसः समद यांची जिनींग शेत शिवार मोजे गंगाखेड ही शेती प्रतिवादी क्र.1 ला दि.28/07/2025 ला विक्री केली आहे. खरेदीखता आधारे प्रतिवादी क्र.1 सदर शेताचा मालक झाला आहे. प्रतिवादी क्र.1 च्या नावाने संपुर्ण कायदेशीर बाबीची पुर्तता होवुन, फेरफार मंजुर होवुन 7/12 मध्ये मालकी वहितीची नोंद झालेली आहे. सदर शेताची उपअधिक्षक भुमिअभिलेख यांच्या मार्फत रितसर मोजणी झालेली आहे व मोजणीमध्ये क्षेत्रफळ 29 आर आढळुन आलेले आहे. ते प्रतिवादी क्र.1 च्या मालकी ताब्यात आहे.

28. असे की, प्रतिवादी क्र.1 ने खरेदीखत झाल्या नंतर आपल्या ताब्यातील क्षेत्रामध्ये सिंमेटचे पोलसह तारेचे कुंपन केलेले आहे. प्रतिवादी शांततापुर्ण कायदेशीर ताबा ठेवुन उपभोग घेत आहे.

29. असे की, वादीच्या प्रस्तुत अर्जा बाबत निवेदन करण्यात

पान..9..वर

येते की, वादीच्या शेता शेजारी प्रतिवादीचे खरेदी क्षेत्र आहे. असे अर्जात वादीचे कथन नाही. त्यामुळे प्रतिवादीने अतिक्रमण करण्याची व वादीला बेदखल करण्याची वादीची भिती निरर्थक आहे. वादीचे खरेदीखत 669 मध्ये पुर्वेसः सर्वे नं.428 क्षेत्रफळ 2 हेक्टर 42 आर, पश्चिमेसः 430, दक्षिणेस 428 मधील भाग व गंगाखेड परळी रोड अशा चतुःसिमा आहेत. उत्तर बाजुची चतुःसिमा खरेदीखता मध्ये नमुद नाही. त्यामुळे खरेदीखत अपुर्ण व चुकीचे आहे. अर्जात वाद अ. मध्ये उत्तरेस प्रतिवादी क्र.4 ते 6 ही चतुःसिमा विनाआधार नमुद करण्यात आलेली आहे. मागणी क्र. क. मध्ये उत्तर बाजुची चतुःसिमा नमुद नाही. या अनुषंगाने वादीची केस प्रथम दर्शणी सिध्द नाही. बॅलेन्स ऑफ कनव्हीनीयन्स वादीच्या हक्कात नाही. संभव्य नुकसान वादीचे नाही. त्यामुळे वादीचा अर्ज प्रतिवादी विरुध्द खारीज करण्यात यावा.

30. असे की, वादीने अर्जात खरेदीख क्र.669 व 668 च्या चतुःसिमा कुठेच नमुद केल्या नाहीत. खरेदीखत नं.668 ची प्रत दाखल केली नाही. स्पेशल सुट नं.57/2024 मध ये तात्पुरता मनाई आज्ञा अर्जाच्या आदेशाची प्रत दाखल केली नाही. वादी स्वच्छ हातानी मा.न्यायालयात आला नाही. वादीने वस्तुस्थिती विद्यमान कोर्टापासुन लपुन ठेवली आहे. त्यामुळे वादी तात्पुरता मनाई आदेश मिळणे हक्कदार नसल्याने वादीचा अर्ज प्रतिवादी विरुध्द खारीज करण्यात यावा.

पान..10..वर

विनंती की,

प्रतिवादीचा से स्विकारण्यात येवुन वादीचा तात्पुरता मनाई आदेश मिळणेचा अर्ज प्रतिवादी विरुध्द खर्चासह खारीज करण्यात यावा.

दिनांकः20/04/2026 प्रतिवादी

मधुसुदन माणिकराव केंद्रे

रा. भाग्य नगर, गंगाखेड जि.परभणी.

सत्यापण

मी प्रतिवादी शपथपुर्वक निवेदन करतो की, सदरील से मधील सर्व मजकुर माझे माहिती प्रमाणे लिहीन्यात आला आहे. तो खरा व बरोबर आहे, मला मान्य आहे. करीता शपथेवर तसदीक करण्यात आली.

दिनांकः20/04/2026 प्रतिवादी

मधुसुदन माणिकराव केंद्रे

रा. भाग्य नगर, गंगाखेड जि.परभणी.

<u>विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,गंगाखेड</u>

विशेष दि.दा.क्र.4/2026

वादी : राहिला बेगम

<u>**विरुध्द**</u>

प्रतिवादी: मधुसुदन

वाद : मनाई आज्ञा.

<u>**शपथपत्र**</u>

मी मधुसुदन माणिकराव केंद्रे वयः59 वर्षे, धंदाः शेती रा. भाग्य नगर, गंगाखेड शपथपुर्वक निवेदन करतो की, वादीने माझे विरुध्द तात्पुरता मनाई आदेश मिळणेस्तव केलेला अर्ज असत्य व खोटा आहे. वादीची केस प्रथम दर्शनी सिध्द नाही. बॅलेन्स ऑफ कनव्हीनियन्स वादीच्या हक्कात नाही. वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेला दुरुस्तीपत्र दस्त कायदेशीर आहे. माझे हक्कात झालेले खरेदीखत कायदेशीर आहे. त्या बाबत मी से मध्ये सविस्तर निवेदन केले आहे. से मधील मजकुर बरोबर आहे. करीता शपथपत्र दिले जे खरे आहे.

दिनांकः20/04/2026 निवेदक

दिनांकः20/04/2026 प्रतिवादी

मधुसुदन माणिकराव केंद्रे

रा. भाग्य नगर, गंगाखेड जि.परभणी.

BEFORE ME
A. B. Kulkarni
Notary Govt. of Maharashtra

NOTARY * MAHARASHTRA
Adv. A.B.KULKARNI GANGAKHED R.NO.937 Exp.Dt.-24/8/2026
GOVERNMENT OF MAHARASHTRA

पान..2..वर

सत्यापण

मी प्रतिवादी शपथपुर्वक निवेदन करतो की, सदरील शपथपत्रा मधील सर्व मजकुर माझे माहिती प्रमाणे लिहीन्यात आला आहे. तो खरा व बरोबर आहे, मला मान्य आहे. करीता शपथेवर तसदीक करण्यात आली.

दिनांकः20/04/2026 प्रतिवादी

मधुसुदन माणिकराव केंद्रे

रा. भाग्य नगर, गंगाखेड जि.परभणी.

NOTARY * MAHARASHTRA
Adv. A.B.KULKARNI GANGAKHED R.NO.937 Exp.Dt.24/8/2026
GOVERNMENT OF MAHARASHTRA

A. B. Kulkarni

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क. स्तर, गंगाखेड. E.17

SPl. C.S. NO. 04/2026

राहीमाबेगम
वि.
मधुसुदन वगैरा.

वाद :- मालकी.

प्रतिवादी क्र 1 तर्फे नम्रपुर्वक अर्ज दिला जातो.

1) असेकी, प्रस्तुत प्रकरण प्रतिवादीचे लेखी निवेदन, म्हणने सादर करणे साठी आहे.

2) असेकी, वादीने वादसमन्स, नोटीस सोबत, खरेदीखत क्र. 668/97, 669/97, दावा क्र. 57/2024 इत्यादी च्या प्रती दिलेल्या नाहीत, वादीस या प्रती त्वरित देण्याच्या निर्देश वादीला देण्यात यावेत. करिता आज लेखी निवेदन दाखल करणेस मजबुरी आहे.

विनंतीकी

अर्ज मंजुर करणे, उपरोक्त कागदपत्रांच्या वादीतर्फे पुर्तता व्हावी आज लेखी निवेदन W.S. स्ताही मजबुरी असल्याने पुढील तारीख देण्यात यावी.

दि. 20/04/2026

प्रतिवादी
मधुसुदन कुंडे.

तर्फे
[signature]
ॲड. एस. डी. तर्कसे.

ORDER
Granted till next date, subject to limitation.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.20 12:42:01 +0530

CJSD, Gangakhed.